CMYK

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 210 ■ गुरूवार, दि. 13 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




वाशिम जिल्ह्यात जलतारा कामांना गती >> पान 2

शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव द्या; आमदार सिद्धार्थ खरात यांनी वेधले सभागृहाचे लक्ष >> पान 3

लोणार मधील २०० एकरातील दुर्गाटेकडीवरील वनराईत अग्नीतांडव >> पान 4


**सुविचार**

अपयशाने खचू नका; अधिक जिद्दी व्हा.



ब्लॉकबस्टर 'पुष्पा' ला टक्कर देणार डेव्हिड वॉर्नर, साऊथ मूव्हीमध्ये 'किसिक गर्ल' सोबत लावणार तडका


आतील पान

# शक्तीपीठ महामार्गामुळे महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानपरिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. हा महामार्ग नागपूरपासून सिंधुदुर्गपर्यंत १२ जिल्ह्यांमधून जाणार असून, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शक्तीपीठांना जोडणारा आहे. त्यामुळे मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राच्या औद्योगिक तसेच आर्थिक विकासालाही चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.**




**शक्तीपीठ महामार्गाचे महत्त्व**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले की, जसे समृद्धी महामार्गामुळे १२ जिल्ह्यांचे जीवनमान बदलले, त्याचप्रमाणे शक्तीपीठ महामार्गामुळेही मोठे परिवर्तन घडेल. या महामार्गामुळे राज्यातील विविध भागांत सुलभ आणि वेगवान वाहतूक व्यवस्था निर्माण होईल, ज्यामुळे व्यापार आणि उद्योगांना गती मिळेल.

**शेतकऱ्यांचे समर्थन आणि चर्चा**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी स्वतः हून या महामार्गासाठी जागा देण्याची तयारी दाखवली आहे. कोल्हापूरच्या एअरपोर्टवर एक हजार शेतकऱ्यांचे निवेदन प्राप्त झाले, ज्यात महामार्गाचे समर्थन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी चर्चा करू, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू. पण हा महामार्ग महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असून तो होणारच, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

**ग्रीनफिल्ड महामार्गाचा महत्त्वाचा निर्णय**

ज्या भागांकडे आजवर दुर्लक्ष झाले, त्या भागांचा विकास करण्यासाठी दिल्ली–मुंबई ग्रीनफिल्ड महामार्ग हे योग्य माध्यम आहे.अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ केनेडी यांचे प्रसिद्ध उद्गार आहेत – अमेरिका श्रीमंत आहे कारण तेथे चांगले रस्ते आहेत. आपण महाराष्ट्राचाही हा विकास याच पद्धतीने साधणार आहोत, असे त्यांनी नमूद केले.

**शक्तीपीठ महामार्गामुळे महाराष्ट्राचे भविष्यातील फायदे**

या महामार्गामुळे शक्तीपीठ आणि औद्योगिक केंद्रे जोडली जातील. मराठवाडा, विदर्भ आणि कोकणातील उद्योगांना चालना मिळेल. राज्यातील वाहतुकीचा वेग आणि सुविधा सुधारतील. पुरवठा साखळी मजबूत होईल आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील. शेतकऱ्यांना अधिक चांगल्या रीतीने बाजारपेठेपर्यंत पोहोचता येईल. हा केवळ रस्ता नसून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठीचे महत्त्वाचे पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## गेवराईतील ग्रामसडक योजनांच्या कामांची चौकशी करणार - ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील गेवराई येथे महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या माध्यमातून मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या रस्त्यांच्या कामांची चौकशी केली जाईल असे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत सांगितले.

या रस्त्यांच्या गुणवत्तेसंदर्भात विधानसभा सदस्य विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता.

ग्रामविकास मंत्री श्री. गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे मुख्य अभियंता यांनी १३ जानेवारी २०२५ रोजीच्या पत्रानुसार राज्य गुणवत्ता समन्वय यांना रस्त्यांची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. आत्तापर्यंत २३ रस्त्यांची तपासणी पूर्ण झाली आहे.

उर्वरित ३४ कामांची तपासणी सुरू असून, लवकरच त्याबाबत अहवाल सादर केला जाईल. ग्रामसडक योजनेत रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करणे कंत्राटदारांना अनिवार्य आहे. मात्र, ५७ पैकी १५ रस्त्यांवर वृक्ष लागवड न केल्यामुळे संबंधित कंत्राटदारांवर १५.१९ लाख इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, असेही ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सभागृहात सांगितले.

## स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विधान भवनात अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री व भारताचे माजी उप पंतप्रधान स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विधान भवनातील त्यांच्या पुतळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, उप मुख्यमंत्री अजित पवार आणि महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे व विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी मंत्री महोदय व दोन्ही सभागृहातील सदस्य तसेच विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (१) (कार्यभार) जितेंद्र भोळे, सचिव (२) (कार्यभार) डॉ.विलास आठवले आणि विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## गडचिरोलीतील राईस मिल अपव्यवहार प्रकरणी कठोर कारवाई होणार- राज्यमंत्री कदम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गडचिरोली जिल्ह्यातील काही राईस मिल धारकांनी शासनाची फसवणूक केली आहे. त्याप्रकरणी त्यांच्यावर कठोर कारवाई करणार असल्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत स्पष्ट केले. विधानपरिषदेत एका लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना त्यांनी सांगितले की, अपव्यवहार करणाऱ्या राईस मिल धारकांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. काहींवर दोन कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला असला तरी, अद्याप तो भरलेला नाही. त्यामुळे संबंधितांवर आणखी कठोर पावले उचलली जातील, अशी माहितीही त्यांनी



यावेळी दिली. याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई केली जाऊन काही प्रकरणांमध्ये संघटित गुन्हेगारी असल्याचे निदर्शनास आल्यास, मकोका कायद्यांतर्गत कारवाई करण्याचा विचार केला जाईल, असेही राज्यमंत्री श्री.कदम यांनी यावेळी सांगितले.

गरीब आणि गरजू कुटुंबांना मिळणाऱ्या तांदळाच्या गुणवत्तेबाबत तक्रारी आल्या आहेत. या संदर्भात कसलीही कुचराई सहन केली जाणार नाही. कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंधित असला तरी, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असेही राज्यमंत्री श्री.कदम यांनी सांगितले.

यासंदर्भात लवकरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात येणार असून त्यात संबंधित प्रकरणांवर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

विधान परिषद सदस्य सर्वश्री अभिजित वंजारी, ड.अनिल परब, परिणय फुके, भाई जगताप आणि विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी या लक्षवेधी सूचनेमध्ये सहभाग घेतला.

## धनंजय देशमुख यांच्या साडूचा व्हिडीओ व्हायरल, बाभुळवाडी गावात सरपंचाची अमानूष मारहाण

**मुंबई/प्रतिनिधी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्दयीपणे हत्या करण्यात आली होती. अशातच बीडमध्ये आणखी एक मारहाणीचा धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे. बीड तालुक्यातील बाभुळवाडी गावात अमानूष मारहाण करतानाचा व्हिडीओ समोर आल्याने पुन्हा खळबळ उडाल्याचं पहायला मिळतंय. मारहाणीचा हा जुना व्हिडीओ असल्याचं देखील समोर आलं आहे. मारहाण करणारा प्रमुख व्यक्ती हा बेडूकवाडी गावचा सरपंच दादा खिंडकर आहे. दादा खिंडकार हा धनंजय देशमुख यांचा साडू आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्याय मिळावा यासाठी दादा खिंडकर पाठपुरावा केलेला आहे.


## पोषण आहारात मृत उंदीर सापडल्याच्या घटनेची चौकशीसाठी समिती

### महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील वडखळ ग्रामपंचायत येथील अंगणवाडी मध्ये बालकांसाठी देण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या पाकिटात मृत उंदीर आढळल्याच्या घटनेची चौकशी करण्यात येईल. याप्रकरणी चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्यात येईल असे महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबतचा प्रश्न सदस्य विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला होता. यावेळी सदस्य प्रशांत ठाकूर, विश्वजित कदम, सरोज आहिरे यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, वडखळ ग्रामपंचायतीच्या सर्व अंगणवाड्यांमध्ये वाटप झालेल्या घरपोच आहाराची पुनर्वितरण प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पुरवठाधारकाकडून खुलासा मागवण्यात आला होता, आणि त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या मते, हा आहार पूर्णपणे स्वयंचलित मशीनद्वारे तयार होतो आणि उत्पादनानंतर अंगणवाडीत पोहोचण्यासाठी १५–२० दिवस लागतात. पाकीटात आढळलेले प्राणी सदृश अवशेष कोरड्या स्थितीत असणे अपेक्षित होते, मात्र ते ओल्या अवस्थेत असल्याने ते अलीकडेच मृत झाले असावेत. तसेच, पूर्णतः स्वयंचलित उत्पादन प्रक्रियेमुळे अशा वस्तूंची उपस्थिती असणे शक्य नाही, असे पुरवठाधारकाने



स्पष्ट केले आहे.

पोषण आहाराच्या पाकिटात मृत उंदराचे अवशेष सापडले, पण प्रयोगशाळांनी हे नमुने तपासले नाही, या प्रकरणी देखील समिती चौकशी करणार आहे.

या प्रकरणात जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. पुरवठादार यात जबाबदार असतील तर त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल असेही मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

## छत्रपती संभाजी स्मारकासमोरील रोहित्र स्ट्रक्चर हलवणार

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** कसबा संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराज स्मारक येथील रोहित्र स्ट्रक्चर अन्य ठिकाणी हलविण्याचे काम येत्या दोन दिवसांत सुरू होणार आहे. कसबा येथील छत्रपती संभाजी महाराज स्मारक येथे १०० केव्हीए आणि २०० केव्हीए रोहित्रे उभी होती. मात्र त्यामुळे स्मारकाजवळ अडचण निर्माण होत असल्याने ती हलवण्याची मागणी स्थानिकांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनी आयोजित कार्यक्रमात कुडाळ मालवणचे आमदार निलेश राणे यांच्याकडे केली होती.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमांमध्ये सुधारणा करणार - पणन मंत्री रावल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कृषी उत्पन्न बाजार समितीवर असलेल्या विश्र्वासापोटी शेतकरी आपला शेतमाल बाजार समितीच्या परवानाधारक व्यापाऱ्यांना विक्री करीत असतो. शेतकरी हिताच्या दृष्टीने काळानुरूप बाजार समितीच्या नियमांमध्ये किंवा धोरणामध्ये सुधारणा करण्यासाठी अपर मुख्य सचिव यांच्या माध्यमातून काम सुरू आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या



नियमांमध्ये शेतकरी हिताच्या दृष्टीने शासन निश्र्चितच सुधारणा करेल, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथे व्यापाऱ्याने शेतकऱ्यांचे कांद्याचे पैसे न दिल्याबाबत सदस्य रमेश बोरनारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

या सूचनेच्या उत्तरात मंत्री रावल म्हणाले, कृषी उत्पन्न बाजार समितीने परवाना दिलेले व्यापारी हे शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करतात. शेतकरी मोठ्या विश्र्वासाने या व्यापाऱ्यांना आपला शेती माल विक्री करतात. अशा व्यापारामध्ये कुठेही शेतकऱ्याचे नुकसान होऊ दिले जाणार नाही. शेतकऱ्यांनी विकलेल्या शेतमालाचा मोबदला कायद्यानुसार त्याच दिवशी किंवा किमान पुढील सात दिवसाच्या आत देणे गरजेचे आहे.

वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांचा मोबदला देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने संबंधित व्यापाऱ्याची मालमत्ता व बँक हमी जप्त केली आहे. या बँक हमी आणि मालमत्तेच्या लिलावातून ३१ लाख रुपये हे कांदा विक्री केलेल्या ११८ शेतकऱ्यांना मोबदला देण्यात आला आहे. कलम ५७ अन्वये व्यापाराच्या वैयक्तिक मालमत्तांची यादी करून जमीन महसूल थकबाकी कायद्यानुसार या सर्व मालमत्तांची एकत्रित लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेला गती देऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे संपूर्ण पैसे देण्यात येतील. या संपूर्ण प्रकरणात बैठकही घेण्यात येईल, असेही पणन मंत्री रावल यांनी सांगितले.

CMYK

## अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते

होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळी प्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मरतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करून नृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.

# वाशिम जिल्ह्यात जलतारा कामांना गती

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते श्रमदान आणि जनजागृती

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशिम/प्रतिनिधी :** वाशिम जिल्ह्यात जलतारा प्रकल्पांतर्गत पाणी व्यवस्थापनाची कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत. या कामांना गती देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विविध गावांमध्ये श्रमदान आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

वाशिम तालुक्याच्या भटउमरा गावात जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या हस्ते आज जलतारा प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या कामांचे निरीक्षण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी स्वतः श्रमदान करून गावकऱ्यांना प्रोत्साहित केले. यावेळी गावकऱ्यांनी दोन हजार जलतारा शोषखड्डे घेण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमाला सरपंच गोदावरी काळे, आर्ट ऑफ लिव्हिंगचे डॉ. हरीश बाहेती, उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, तहसीलदार निलेश पळसकर, गटविकास अधिकारी





रवींद्र सोनवणे, हभप श्रीकृष्ण महाराज राऊत, पाणी फाउंडेशनचे सुभाष नानोटे आणि अविनाश मारशेटवार यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी गावकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, जलतारा प्रकल्प हा केवळ शासकीय उपक्रम नसून, लोकसहभागातून राबवलेला एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. यामुळे पाण्याची बचत होईल आणि भूजल पातळी वाढण्यास मदत होईल. प्रत्येक गावकऱ्याने या प्रकल्पात सक्रिय सहभाग घ्यावा. आर्ट ऑफ लिव्हिंगचे डॉ. हरीश बाहेती यांनी जलतारा प्रकल्पाचे महत्त्व विशद करताना सांगितले.

या प्रकल्पामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होईल, ज्यामुळे पाण्याची कमतरता दूर होईल. १२ गावांमध्ये श्रमदान आणि जनजागृती मोहीम आसोला, वाघजाळी, कामठवाडा, कोंडाळा, सुराळा, तोरनाळा, सावंगा, पांडवउमरा, माळेगाव, ब्राम्हणवाडा, चिखली सुर्वे आणि भटउमरा या १२ गावांमध्ये जलतारा प्रकल्पांतर्गत श्रमदान आणि जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेत गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा आणि प्रत्येक एकराला एक जलतारा या संकल्पनांवर आधारित कामे सुरू आहेत.

उपजिल्हा अधिकारी कैलास देवरे यांनी गावकऱ्यांना संबोधित करताना सांगितले, जलतारा प्रकल्प हा आपल्या सर्वांसाठी एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून आपण आपल्या परिसरातील पाण्याची समस्या दूर करू शकतो. या प्रकल्पात अधिकाधिक गावकऱ्यांनी सहभागी व्हावे आणि आपल्या परिसराला समृद्ध करावे. दुष्काळात या १२ गावांतून पाणी दिंडी काढल्यास पाऊस पडतो, या अनुभवामुळे या परिसराला कायमस्वरूपी पाणीदार बनवण्याचा निर्धार गावकऱ्यांनी केला आहे. पाणी दिंडी आनंदी दिंडीत परावर्तित व्हावी, १२ गावांचा परिसर प्रति एकर एक प्रमाणे जलतारा या कामाने पाणीदार व्हावा, शेतकरी व शेतमजूर आनंदी व्हावा या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# ॲग्रीस्टॅक योजना

शेतीच्या आधुनिकतेसाठी आणि शेतकऱ्यांना अधिक सोयीसुविधा मिळाव्यात म्हणून केंद्र व राज्य शासनाने 'ॲग्रीस्टॅक' (AgriStack) योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा डिजिटल डाटाबेस तयार करून, शेतीविषयक सेवा अधिक जलद आणि पारदर्शक केल्या जातील. नांदेड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

**ॲग्रीस्टॅक म्हणजे काय?**

'ॲग्रीस्टॅक' म्हणजे शेतकऱ्यांसाठी डिजिटल ओळखपत्र प्रणाली. यात प्रत्येक शेतकऱ्याला एक युनिक ओळख क्रमांक (Unique Farmer ID) दिला जातो. या क्रमांकाच्या आधारे शेतकऱ्यांना विविध सरकारी योजना आणि अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात मिळणार आहे. तसेच, पीककर्ज, विमा, अनुदान, खत व बियाणे या सर्व बाबतीत ही योजना उपयुक्त ठरेल.

जिल्हयातील नोंदी

ॲग्रीस्टॅक' म्हणजे शेतकऱ्यांसाठी डिजिटल ओळखपत्र प्रणाली. आतापर्यंत जिल्हयात २ लक्ष ४५ हजार २७६ शेतकऱ्यांनी नोंद केली आहे. जिल्ह्यातील सोळा तालुक्यांमध्ये हिमायतनगर तालुक्यात सर्वाधिक नोंद झाली आहे तर कंधार तालुक्यात सर्वात कमी नोंद झाली आहे. ही आकडेवारी १२ तारखेपर्यंतची असून १२ व १३ तारखेला यामध्ये भर पडण्याची अपेक्षा आहे. याकडेवारी वाढावी यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून प्रत्येक शेतकऱ्याची नोंद करण्याचे निर्देश जिल्हाधिकारींनी दिले आहे.

**योजनेचे स्वरूप आणि फायदे**

**१) थेट लाभ हस्तांतरण (DBT)**

पीएम किसान सन्मान निधी, पीक विमा, नैसर्गिक आपत्ती मदत इत्यादी अनुदाने थेट बँक खात्यात जमा होतील. यामुळे मध्यस्थांची गरज भासणार नाही, पारदर्शकता राहील.

**२) पीककर्ज व विम्यासाठी सोपी प्रक्रिया**




पीक विमा आणि कर्ज मिळवण्यासाठी अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्याची गरज भासणार नाही. हे एक ओळखपत्र परिपूर्ण ठरेल.

ॲग्रीस्टॅकमधील नोंदीनुसार कर्ज मंजुरी जलद गतीने होईल.

**३) शेतीसाठी अनुदान आणि इतर सुविधा**

खत, बियाणे व औषधांसाठी शेतकऱ्यांना थेट अनुदान मिळेल. हवामान अंदाज, मृदा परीक्षण, सिंचन योजना यांची माहिती सहज उपलब्ध होईल.

**४) नैसर्गिक आपत्ती व शेतीसाठी मदत**

दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी किंवा अन्य आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीसाठी मदतीसाठी शेतकऱ्यांची माहिती आधीच उपलब्ध असेल, त्यामुळे मदतीचे वाटप जलदगतीने होईल.

Agristack

**नोंदणी प्रक्रिया कशी करावी?**

नांदेड जिल्ह्यात दि. ८ मार्च २०२५ ते १३ मार्च २०२५ या कालावधीत विशेष ॲग्रीस्टॅक नोंदणी सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावात शिबिरांचे आयोजन केले गेले आहे. महसूल, कृषी व जिल्हा परिषद विभागाच्या संयुक्त पथकाद्वारे ही नोंदणी केली जाईल.

शेतकऱ्यांनी खालील कागदपत्रांसह आपल्या गावातील CSC (कॉमन सर्व्हिस सेंटर) येथे जाऊन नोंदणी करावी –

**आधार कार्ड**

**आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक**

**सातबारा उतारा (७/१२)**

नोंदणी प्रक्रिया पूर्णतः मोफत आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता नोंदणी करून घ्यावी.

**ई–केवायसीही आवश्यक!**

यासोबतच, रेशन कार्ड धारकांसाठी ई–केवायसी करणे बंधनकारक आहे.

पात्र लाभार्थ्यांनी स्वतःच्या गावातील रास्तभाव दुकानात जाऊन ई–पॉश मशिनवर बायोमेट्रिक प्रमाणीकरण करावे.

तसेच, राज्य सरकारच्या 'मेरा ई–केवायसी' मोबाईल ॲपद्वारे घरी बसूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येऊ शकते.

ई–केवायसी न केल्यास शासकीय अन्नधान्याचा लाभ बंद होईल, त्यामुळे लवकरात लवकर प्रक्रिया पूर्ण करावी.

**आयुष्यमान भारत कार्डसाठी संधी**

याच संधीचा फायदा घेत नागरिकांनी आयुष्यमान भारत कार्ड काढून घ्यावे. यासाठी आवश्यक कागदपत्रे –

**आधार कार्ड (झेरॉक्स)**

**रेशन कार्ड (झेरॉक्स)**

**मोबाईल क्रमांक**

नांदेड जिल्ह्यात सध्या गावोगावी कॅम्प सुरू आहेत. नागरिकांनी तिथे उपस्थित राहून रेशन कार्ड ई–केवायसी, ग्रीस्टॅक व आयुष्यमान कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांसाठी महत्वाची बाब!**

नांदेड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी ८ मार्च ते १३ मार्च २०२५ या कालावधीत आपल्या गावातील नोंदणी शिबिरात जाऊन ॲग्रीस्टॅक नोंदणी करून घ्यावी. ही योजना शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि तांत्रिक सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे कोणत्याही गैरसमजात न पडता, योग्य कागदपत्रांसह आपल्या गावातील CSC केंद्रात जाऊन नोंदणी करावी.

शासनाच्या या पुढाकारामुळे शेतीला नवा आधुनिक दृष्टिकोन मिळेल आणि शेतकऱ्यांना डिजिटल सेवांचा अधिक लाभ मिळेल.

यासाठी आपल्या गावातील CSC सेंटर, महसूल विभाग, किंवा कृषी विभाग अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

## ब्लॉकबस्टर 'पुष्पा' ला टक्कर देणार डेव्हिट वॉर्नर, साऊथ मूव्हीमध्ये 'किसिक गर्ल' सोबत लावणार तडका

**मुंबई/प्रतिनिधी :** ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू डेव्हिड वॉर्नरने क्रिकेटमध्ये तर आपली कमाल दाखवलीच आहे. आता तो थेट अभिनयाची जादू प्रेक्षकांना दाखवणार आहे. डेव्हिड वॉर्नर लवकरच मनोरंजन विश्र्वात पदार्पण करण्यास तयार आहे. बॉलिवूड नव्हे तर तो साऊथ सिनेसृष्टीचा मोठा चाहता आहे. त्यामुळे तो तेलुगू इंडस्ट्रीतून पदार्पण करणार आहे. डेव्हिड वॉर्नर अभिनयात येणार ऐकून त्याचे चाहते तर खूपच उत्सुक आहेत.

डेव्हिड वॉर्नर तेलुगू सिनेमातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार आहे. वॉर्नर 'रॉबिनहूड' या चित्रपटात झळकणार आहे. निथिन आणि श्रीलीला यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन वेंकी कुडुमुला यांनी केले आहे.

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फतच्या निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत एक महिन्यात चौकशी करुन कारवाई - मुख्यमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत भाडेतत्वावर बस गाड्या घेण्यासंदर्भात काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेतील अनियमिततेची एक महिन्यात चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य राजेश राठोड यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्र्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महामंडळाच्या स्तरावर ही प्रक्रिया राबवण्यात आली. ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली असून यामुळे परिवहन विभागाचे १७०० कोटी रुपये वाचले आहेत. याबाबत एक महिन्याच्या आत चौकशी करून संबंधितांवर कारवाई केली जाईल.

याबाबत माहिती देताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रचलित पद्धतीनुसार विभागनिहाय गाड्या घेण्याची पद्धत बंद करून सर्व विभागांची तीन समूहामध्ये विभागणी करून प्रत्येक समूहात किमान ४०० ते ४५० याप्रमाणे सात वर्षासाठी १३१० बस गाड्या भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच सर्व विभागांना केवळ एकत्रित निविदेनुसार तीन समूहात बस गाड्या पुरवण्यात येणार आहेत.यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य ड.अनिल परब, प्रवीण दरेकर यांनी सहभाग घेतला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## विविध वृत्त...

### इको फ्रेंडली होळीसाठी सामाजिक वनीकरण व राष्ट्रीय हरित सेनेचा पुढाकार






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** होळीचा सण जवळ आला असून इको फ्रेंडली होळीसाठी राष्ट्रीय हरित सेनेने पुढाकार घेतला आहे. पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने राष्ट्रीय हरित सेनेकडून जणजागृती केली जात आहे. तसेच होळीत नैसर्गिक रंगाचा वापर करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने राज्यभर जनजागृती करण्यात येते आहे. बुलढाणा येथील एडेड विद्यालयाचे राष्ट्रीय हरित सेना प्रमुख रमेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विविध उपक्रम राबवित आहेत. नैसर्गिक रंग बनविण्यासाठी विविध प्रकारच्या फुलांपासून ओले व कोरडे रंग बनविले जातात. नैसर्गिक रंगांपासून शरिराला कुठलेच अपाय होत नाहीत. पळसाच्या फुलापासून लाल रंग बनविण्यात बनवण्यात आला. हळदमध्ये अरारूट पावडर मिसळून पिवळा रंग, बीटपासून जांभळा रंग तर कडूलिंबाचा पाला व पालक एकत्र करुन हिरवा रंग तयार करण्यात आला असून, नागरिकांनी नैसर्गिक रंगाचा वापर करावा असे आवाहन यावेळी सामाजिक वनीकरणाचे विभागीय वनाधिकारी विपुल राठोड यांनी केले आहे.

### सोने व्यापाऱ्याची दोन कोटी तीस लाख रुपयांनी बोगस चेक देत फसवणूक



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपुरातील सोने व्यापार करणाऱ्या दुकानदाराला ३ किलोपेक्षा जास्त वजनाचे सोन्याचे दागिने खरेदी करून त्यांच्या बदल्यात बोगस चेक देत फसवणूक करत सोने व्यापाऱ्याची २.३० कोटींची फसवणूक केली आहे. या प्रकारातील फिर्यादी जयंत वसंतराव पालकर यांनी पोलिसांना तक्रार दिली आहे. फिर्यादी संभाजी चौकाजवळील श्री सप्तश्रृंगी ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. या दुकानात आरोपी राहुल खाबिया याने सोने व्यापारी कडून सोने खरेदी करून या सोने व्यापाऱ्याचा विश्र्वास संपादन करून हळूहळू आधी रोख रक्कम मध्ये सोने खरेदी करून नंतर त्याने चेकच्या माध्यमातून सोने खरेदी करून बोगस चेक देऊन फसवणूक केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अधिक चौकशी केली असतात आणखी काही सोने व्यावसायिकांसोबत त्याने असा प्रकार केल्याचे दिसून आले. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस करत आहेत.

### भुसावळ शहरातील गर्दीच्या ठिकाणी पोलीस बळ वाढविणार – गृह राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर

**मुंबई/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील भुसावळ शहरात वारंवार घडणाऱ्या गुन्हेगारी स्वरुपाच्या घटनांवर आळा घालण्यासाठी जळगाव पोलिसांमार्फत गर्दीच्या व सार्वजनिकदृष्ट्या महत्वाच्या ठिकाणी नियमित पेट्रोलिंग सुरू आहे. अशा ठिकाणी पोलीस बळ वाढवून देण्यात येईल, असे गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य एकनाथ खडसे यांनी भुसावळ शहरात १० जानेवारी रोजी एका तरुणाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला.

याबाबत अधिक माहिती देताना डॉ.भोयर म्हणाले, याप्रकरणी भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाणे येथे दि. १० जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. अशा घटनांना आळा घालण्यासाठी अचानकपणे ऑलआऊट कोम्बिंग ऑपरेशन राबवून सराईत गुन्हेगारांवर नियमित लक्ष ठेवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सराईत गुन्हेगार व आरोपींवर मोठ्याप्रमाणावर एमपीडीए, हद्दपार तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. मुक्ताईनगर येथील घटनेच्या अनुषंगाने गुन्हेगारावर लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी एका उपप्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

# लोणार मधील २०० एकरातील दुर्गाटेकडीवरील वनराईत अग्नीतांडव



## शेकडो दुर्मिळ वृक्ष आगीच्या भक्षस्थानी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जगप्रसिद्ध असलेल्या खाऱ्या पाण्याचे सरोवर हे बुलढाण्यातील लोणार मध्ये. या लोणार सरोवराला लागून असलेल्या लोणी रोडवरील दुर्गा टेकडी परिसरातील जवळपास २०० एकर वनराईला भीषण आग लागली आहे. या आगीत शेकडोंच्या संख्येतील वृक्ष आगीच्या भक्षस्थानी सापडले. याशिवाय वनराईत असलेले वन्यप्राणी देखील काही होरपळले आहे.

तर शेकडो पक्षी, पक्षांची घरटे, पक्षांची अंडे आगीच्या भक्षस्थानी सापडले आहे. लोणार नगरपालिकेचे अग्निशामक दल वेळेवर पोहोचले नसल्यामुळे खाजगी टँकर बोलावून दुर्गा टेकडी संस्थान ट्रस्टने आग विझवण्याचा प्रयत्न केला. रिसोड नगरपालिकेचे देखील अग्निशामक दल घटनास्थळी पोहोचले होते. मात्र, अग्निशामक दलाचे आग विझवण्यासाठीचे आवश्यक साहित्य वनराईत दूरपर्यंत पोहोचले नाही. स्थानिकांनी झाडांचा पालापाचोळा तोडून जीव धोक्यात घालून आग विझवली आहे.

# शासकीय कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करुन मारहाण

## ग्रामपंचायत कार्यालयात येऊन ग्रामविकास अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून मारहाण व जीवे मारण्याची धमकी




दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी आरोपी तौफीक शहा कट्टू शहा रा. डोणगाव याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना १२ मार्च रोजी दुपारी २ ते ५ वाजताच्या दरम्यान डोगणाव ग्रामपंचायत कार्यालय घटली घटनेबाबत पोलीस सूत्रांकडून मिळाल्या माहितीनुसार डोणगाव ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी दिपक तुकाराम तांबारे वय ५६ यांनी डोणगाव पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, डोणगाव ग्रामपंचायत कार्यालयात शासकीय कामकाज सुरू असताना आरोपीने १२ मार्च रोजी दुपारी २ ते ५ वाजताच्या दरम्यान ग्रामपंचायत कार्यालयात येऊन शिवीगाळ केली व तसेच कालर पकडुन जमीनीवर पाडुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. यात माझ्या डाव्या हाताच्या बोटाला इजा झाली. शासकीय कामात अडथळा निर्माण केला.धमकी देत गावात कसा येतो मी पाहतो. व गावात आल्यास जिवे मारु अशी धमकी दिली.यावेळी गणेश वामन घोगल, शाम अशोक खोटे हे होते. अशा फिर्यादीवरून आरोपीविरूद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.घटनेचा पुढील तपास डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे करीत आहेत.




# वाशिममध्ये बाल व किशोरवयीन कामगार मुक्ती अभियान

## कारवाईत एका बालकामगाराची मुक्तता, मालकाविरोधात गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** कामगार उप आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली व सरकारी कामगार अधिकारी, वाशिम यांच्या नेतृत्वात बाल व किशोरवयीन कामगार नियमन व निर्मूलन अधिनियम १९८६ व सुधारित अधिनियम २०१६ अंतर्गत बाल व किशोरवयीन कामगार मुक्ती अभियान राबवण्यात आले.

या मोहिमेत (प्र) दुकाने निरीक्षक योगेश गोटे, श्रीमती चैताली खोंड, जिल्हा परिषद विस्तार अधिकारी बबन सुर्वे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल रुईकर, चाईल्ड हेल्पलाइन १०९८ चे जिल्हा प्रकल्प पर्यवेक्षक, गोपाल आरु, शहर पोलिस स्टेशनचे पो.कॉ. श्रेयस नेतनसकर, स्वप्नना काळमुंदळे यांनी संयुक्तपणे कारवाई केली.

या कारवाईत आस्थापनेवर छापा टाकुन एका किशोरवयीन कामगाराची मुक्तता करण्यात आली. संबंधित मालक जुझर हुसेन यांच्यावर वाशिम पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई प्रशासनाच्या कठोर भूमिकेचे स्पष्ट प्रतीक असून, बालमजुरीविरोधातील संघर्षासाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अशा कठोर कारवाया भविष्यातही सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# ‘त्या’ विद्यार्थ्याच्या आत्महत्या प्रकरणी दोषींवर कारवाई करावी

## आमदार सिद्धार्थ खरात यांचा विधानभवनात प्रश्न

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** अकोला येथे नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या बेलगाव येथील प्रसन्न गोपीनाथ वानखेडे या सतरा वर्षीय विद्यार्थ्याने अकोला येथे गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली होती. या विद्यार्थ्यांच आत्महत्या प्रकरणी पंकज चव्हाण व पोलीस कॉन्स्टेबल खंदारे यांच्यावर कारवाई करून निलंबित करावे अशी मागणी मेहकर मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभा सभागृहात केली.



डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून नीट ची तयारी करणारा प्रसन्न वानखडे हा अकोल्यातील आकाशवाणी परिसरातील जलाराम सोसायटीत भाड्याने खोली करून राहात होता. २८ फेब्रुवारीच्या संध्याकाळी ७ वाजता त्याने खोलीत गळफास घेत आत्महत्या केली. त्याचा वर्गमित्रासह नातेवाइक असलेला एक पोलीस अधिकारी आणि एका पोलीस कर्मचाऱ्याच्या जाचापायी नैराश्य आल्याने प्रसन्नने आत्महत्या केल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे.



सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून पंकज चव्हाण व पोलीस कॉन्स्टेबल खंदारे यांच्यावर कारवाई करावी त्यांचे निलंबित करावे, असा प्रश्न आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभा सभागृहात उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले.या प्रकरणात आता गृह विभाग काय कारवाई करते याकडे लक्ष लागलेले आहे.

## जलसंधारण विभागाकडील बंधाऱ्यांचे डिजिटलायझेशन – मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

**मुंबई/प्रतिनिधी :** जलसंधारण विभागाकडील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे डिजिटलायझेशन करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला असल्याची माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी दिली.



परभणी जिल्ह्यातील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या बाबतीत सदस्य डॉ. राहुल पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मंत्री श्री. राठोड यांनी सांगितले, जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागामार्फत परभणी जिल्ह्यात ६२ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्यात आले. ४५ बंधारे सुस्थितीत असून त्यांना गेट बसवण्यात आले आहेत त्याद्वारे अपेक्षित सिंचन होत आहे. १७ नादुरुस्त बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचा कार्यक्रम जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून केला जाणार आहे. तसेच जलसंधारण विभागाकडील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याबद्दल तक्रारी प्राप्त होतील त्याची चौकशी केली जाईल, असेही मंत्री श्री. राठोड यांनी सांगितले.

जलसंधारण विभागामार्फत गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना आणि जलयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत असल्याचे मंत्री श्री. राठोड यांनी सांगितले.

# वाशिम जिल्ह्यात पाणीटंचाईवर पहिली आढावा बैठक

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** वाशिम जिल्ह्यात संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पहिली आढावा बैठक पार पडली. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग अजिंक्य वानखेडे तसेच दूरदृशीय प्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हाधिकारी बुवनेश्र्वरी एस यांनी तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंत्यांना गावांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन टंचाई स्थितीची खात्री करून उपाययोजना राबवण्याच्या सूचना दिल्या. वाशिम जिल्ह्यातील १९५ गावांमध्ये २१० विहिरी अधिग्रहण करण्याचे प्रस्तावित असून, आतापर्यंत वाशिम तालुक्यातील तामसी आणि केकत उमरा तसेच मालेगाव तालुक्यातील वरदरी बुद्रुक येथे तीन विहिरींचे अधिग्रहण पूर्ण करण्यात आले आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अहवालानुसार जिल्ह्यातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणावर घटली असून, भविष्यात टंचाईची समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासनाला पाणीटंचाईच्या उपाययोजना जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता जाणवू नये यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून, पाणी बचतीसाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

